महाराष्ट्र पोलीस

# पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे कार्यालय

दुरध्वनी क्र. ०२४५६-२२१७४४ नियंत्रण कक्ष ०२४५६- २२०२३२ फॅक्स क्र.०२४५६-२२३२३३

शाखा :आस्थापना शाखा ई-मेल sp.hingoli@mahapolice.gov.in

जा.क्र.आस्था-१/पो.कर्म./स.सा.बदल्या-२०२१/२०२१ हिंगोली ,दिनांक 26.०३.२०२१

**विषय :- सन २०२१ सर्वसाधारण बदल्या बाबत**

---oo---

परिपत्रक

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ पोलीस शिपाई पदांच्या बदल्यांबाबत गृह विभाग,परिपत्रक क्रमांक न्यायाप्र ३११५/प्र.क्र.८८/पोल-३,दि.१.७.२०१५ अन्वये माहे एप्रिल-मे २०२१ मध्ये सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक, पोलीस शिपाई यांच्या जिल्हातंर्गत बदल्या करावयाच्या आहेत. त्यासाठी जिल्हयातील ज्या पोलीस अंमलदारांना सध्याच्या नेमणूकीच्या ठिकाणी दिनांक ३१.५.२०२१ पर्यंत किंवा त्यापूर्वी ५ वर्षे पूर्ण झाले आहेत अशा अंमलदारांकडून खालील नमूद अटींच्या अधीन राहून त्यांच्या पसंतीचे ३ ठिकाणांसह विनंती अर्ज प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने या कार्यालयास एकत्रित दिनांक १०.०४.२०२१ पर्यंत मागविण्यात येत आहेत. अंमलदारांनी त्यांचे बदलीबाबतचे विनंती अर्ज परस्पर या कार्यालयात सादर करु नयेत. परस्पर अर्ज सादर केल्यास त्या विनंती अर्जाचा कोणत्याही प्रकारण्चा विचार न करता सदरचे विनंती अर्ज दप्तरी दाखल करण्यात येईल.

**सर्व साधारण बदल्या - २०२१ ह्या खालील ०३ प्रकारात मोडतात.**

१. विहीत कालावधी पूर्ण झाल्याने बदली.
२. विहीत कालावधी पूर्ण नाही, परंतु, मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेली लेखी विनंती.
३. प्रतिकूल अहवालावरून करावयाची बदली.

**अ. विहीत कालावधी पूर्ण झालेले :-**

दि.३१.०५.२०२१ पर्यंत किंवा त्यापुर्वी ज्या पोलीस अंमलदारांना ते सध्या कार्यरत असलेल्या ठिकाणी ०५ वर्षे अशी सेवा / कर्तव्य बजावले आहे असे बदलीपात्र पोलीस अंमलदार.

**ब. विहीत कालवावधी पूर्ण नाही, परंतू, मुद्रतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज :-**

ज्या पोलीस अंमलदार यांना त्यांच्या सध्याच्या पदावर विहीत कालावधी पूर्ण केलेला नाही. परंतु, त्यांना इतर ठिकाणी बदली हवी असेल, अशा पोलीस अंमलदारांनी त्यांच्या विनंतीच्या ठिकाणासह व अशी बदली का पाहिजे सबळ कारणांसह त्वरेने माहिती मागविण्यात येईल.

**क. प्रतिकुल अहवालावरून बदली करावयाचे:-**

ज्या पोलीस अंमलदारांची प्रतिकुल अहवालानुसार बदली करावयाची असल्यास संबंधीत प्रभारी अधिकारी यांनी संबंधीत पोलीस अंमलदारांच्या बदलीबाबत परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठवावा.

दि.२४.०३.२०२१ पूर्वी या कार्यालयात पाठविलेले सर्व प्रकारचे विनंती अर्ज या परिपत्रकान्वये रद्द समजण्यात येतील.त्यावर पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून कोणतेही कार्यवाही करण्यात येणार नाही.

**अटी :-**

१. पसंतीचे ठिकाणामध्ये स्वग्राम, तालूका इत्यादीचा समावेश नसावा.
२. पसंतीच्या ठिकाणी यापूर्वी सेवा केलेली नसावी.
३. स्थानिक गुन्हे शाखा/जिल्हा विशेष शाखा/दहशतवाद विरोधी सेल/शहर वाहतूक शाखा/बॉम्ब शोधक व नाशक पथक/ पोलीस नियंत्रण कक्ष येथे ज्या पोलीस अंमलदारांची **दि.३१.५.२०२१ पर्यंत किंवा त्यापुर्वी ५ वर्षे** पूर्ण झाले आहेत अशा पोलीस कर्मचाऱ्यांनी वर नमूद १ व २ अटींच्या अ धिन राहून विनंती अर्ज सादर करावेत.

२) ज्या पोलीस अंमलदारांच्या अडी-अडचणी आहेत, त्यांचा सध्याच्या नेमणूकीच्या ठिकाणी ५ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला नाही. परंतु अडी-अडचणीमुळे बदली पाहिजे असल्यास, त्यांनी देखील वरील अटींच्या अधीन राहून पसंतीचे ३ ठिकाण नमूद करुन अर्ज सादर करावेत. परंतु त्यांच्या बदल्या होतीलच असे गृहीत न धरता त्या प्रशासकिय सोई नुसार करण्यात येतील.

३) ज्या अंमलदारांनी शिट रिमार्कच्या वेळी तसेच आज्ञांकित कक्षात बदली सबंधात विनंती केली असेल व सर्वसाधारण बदली-२०२१ चे वेळी विचार करण्यात येईल असे कळविले असेल तर त्याचा स्पष्ट उल्लेख अर्जा मध्ये करुन अर्ज सादर करावा.

४) ज्या अंमलदारांना सध्याच्या ठिकाणचा कार्यकाळ ५ वर्षाचा पूर्ण झालेला आहे परंतु, त्यांनी त्यांच्या पसंतीचे ठिकाण कळविलेले नाही तेव्हा ते कोठेही बदलून जाण्यास इच्छूक आहेत असे गृहीत धरुन बदल्या करण्यात येतील.

५) पसंतीच्या ठिकाणी रिक्त पदे नसल्यास किंवा काही प्रशासकिय अडचण आल्यास प्रशासकीय सोईनुसार बदल्या करण्यात येतील.

६) ज्यांना बदलीसाठी अर्ज करावयाचा आहे. त्यांनी त्यांचा अर्ज पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना उद्येशुन लिहावा व तो अर्ज आपले नेमणूकीचे ठिकाणी प्रभारी अधिकारी ( पो.स्टे./शाखा प्रभारी) यांच्या कडे सादर करावा. कुणीही अंमलदार बदलीबाबत अर्ज घेऊन या कार्यालयात येणार नाही व थेट कार्यालयात कुणाचाही अर्ज स्विकारला जाणार नाही. तसेच सदरील परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वी बदलीसाठी दिलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. त्यांनी पून्हा नवीन अर्ज सादर करु शकतात.

७) ज्या पोलीस अंमलदारांची प्रतिकुल अहवालानुसार बदली करावयाची असल्यास संबंधीत प्रभारी अधिकारी यांनी संबंधीत पोलीस अंमलदारांच्या बदलीबाबत परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठवावा.

८) सर्व पोस्टे / शाखाधिकारी यांनी त्यांच्याकडे नेमणुकीस असलेल्या वाहन चालकाचे अर्ज सविस्तर माहिती व आपल्या **अभिप्रायासह दिनांक १०.०४.२०२१ रोजी पर्यंत स्वतंत्र रित्या सादर करावेत.**

९) सर्व पोलीस स्टेशन / शाखा प्रभारी अधिकारी यांनी सदरचे परिपत्रक सर्व अंमलदारांना सतत ५ दिवस हजेरीवर वाचून दाखवावे. पोलीस स्टेशन/शाखा चे नोटीस बोर्डावर लावावे व अंमलदारांना समज मिळाल्या बाबत स्वाक्ष-या घ्याव्यात आणि ज्यांना अर्ज सादर करावयाचा आहे. त्यांचे विहित नमुन्यातील अर्ज **एकत्रित करुन त्यावर आपले पत्रक जोडून सर्व अर्ज दिनांक १०.०४.२०२१ रोजी पर्यंत** या कार्यालयात खास दुता मार्फत दाखल करावेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्याची जबाबदारी सबंधीत पो.स्टे./शाखा प्रभारी अधिकारी यांची राहील याची नोंद घ्यावी.

**(एम.राकेश कलासागर)**
**पोलीस अधीक्षक, हिंगोली**

**सोबत :- अर्जाचा विहीत नमूना**

प्रति,

सर्व पो.स्टे.प्रभारी अधिकारी, हिंगोली जिल्हा
सर्व शाखा प्रभारी अधिकारी, हिंगोली जिल्हा.
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगोली जिल्हा.

# बदलीसाठी विनंती अर्ज

**प्रति,**

**मा.पोलीस अधीक्षक,**
**हिंगोली**

मार्फत :- पो.नि./स.पो.नि./रा.पो.नि.------ - - ----- ---- -- ---------------

संदर्भ :- मा.पोलीस अधीक्षक,हिंगोली यांचे परिपत्रक क्रमांक .आस्था-१/ पो.कर्म./ स.सा.बदल्या - २०२१/ २०२१, हिंगोली दिनांक २४.०३.२०२१

विषय :- **बदली होणे बाबत**

अर्जदार :- पोशि/पोना/पोह/सपोउपनि/ब.क्र. संपूर्ण नांव - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - नेमणूक/तैनात -------- - - - - - - -

---ooo---

**महोदय,**

उपरोक्त संदर्भात नमूद परिपत्रकान्वये सादर करण्यात येते/करते की, मी वरील अर्जदार पो.स्टे./शाखा- - - - - - - - - - - - - - येथे दिनांक / / पासून नेमणूकीस असून **दिनांक ३१.५.२०२१ रोजी** मला नेमणूकीचे ठिकाणी ( ) वर्ष ( ) महिन्याचा कालावधी झाला आहे. माझ्या अर्जाच्या मागील बाजूस तक्त्यात दिलेल्या माहिती वरुन माझी बदली करण्यास विनंती आहे.

करीता सविनय सादर

**अर्जदाराची स्वाक्षरी :**

**अर्जदाराचे संपूर्ण नांव :**

**हुद्दा :**

**बक्कल क्रमांक :**

**सध्याची नेमणूक :**

| अ.क्र. | अर्जदाराचे पुर्ण नांव | सध्याचे नेमणूकीचे ठिकाण व नेमणूकीचा दिनांक | भरती दिनांक व सेवानिवृती दिनांक | अर्जदाराचे मुळ गाव व तालूका | भरती पासुनच्या नेमणूका व दिनांक | सीट रिमार्क /अज्ञांकीत कक्षात (OR) मध्ये विंनती केली असल्यास विनंतीचा दिनांक | पसंतीचे पोस्टे/शाखा (फक्त-३) | बदली मागण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

करिता सविनय सादर

अर्जदाराची स्वाक्षरी :-

अर्जदाराचेपूर्णनांव :-

हुद्दा /ब.क्र. :-

सध्याची नेमणूक :-

मोबाईल क्रमांक :-